महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३१८ वे | दिनांक : १९/११/२०२६ | वार : गुरुवार

मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांवर टीका केल्यास तिन्ही पक्ष एकवटणार : छगन भुजबळांचा विरोधकांना इशारा



मुंबई : मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांविरोधात चुकीची वक्तव्ये किंवा आरोप करणाऱ्यांना महायुतीतील तिन्ही पक्ष एकत्र येऊन प्रत्युत्तर देणार, असा इशारा मंत्री छगन भुजबळ यांनी दिला आहे. लोकशाहीच्या नावाखाली कोणालाही काहीही बोलण्याची मुभा असू शकत नाही. मर्यादा ओलांडून वक्तव्य करणाऱ्यांचा मुकाबला तिन्ही पक्षांचे नेते, आमदार आणि कार्यकर्ते एकत्रितपणे करतील, असे भुजबळ म्हणाले. मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी महायुतीमधील नेत्यांना एकमेकांविरोधात वक्तव्ये न करण्याचे आवाहनही केले. महायुतीमधील घटक पक्षांच्या नेत्यांनी आपापसातील मतभेद सार्वजनिक व्यासपीठावर मांडण्याऐवजी वरिष्ठ नेतृत्वाकडे मांडावेत, अशी भूमिका भुजबळांनी स्पष्ट केली. एखाद्या विषयावर नाराजी किंवा अडचण असेल तर मुख्यमंत्री अथवा संबंधित नेत्यांशी चर्चा करावी. मात्र, एकमेकांविरोधात वावगे बोलणे टाळले पाहिजे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांविरोधात चुकीचे आरोप किंवा वक्तव्ये केली जात असतील, तर तिन्ही पक्ष एकत्र येऊन त्याला उत्तर देतील, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, दुष्काळी परिस्थिती, जलसंधारण आणि शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवरही बैठकीत चर्चा झाल्याची माहिती भुजबळांनी दिली. समितीच्या अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीला दादा भुसे, हसन मुश्रीफ, गिरीश महाजन आणि छगन भुजबळ उपस्थित होते. सर्व पक्षांनी दुष्काळी भागात आवश्यक कामे करण्यावर भर दिला. मनरेगा अंतर्गत कामे, जलसंधारणाच्या उपाययोजना आणि शेतकऱ्यांना मदत कशी पोहोचवता येईल, याबाबत बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. तांत्रिक कारणांमुळे शेतकऱ्यांना अग्रीम मदतीची रक्कम मिळाली नसेल, तर संबंधित अडचणी तातडीने दूर करून मदत पोहोचवण्याची गरज असल्याचे भुजबळ म्हणाले. मदतीची प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठी लोकसहभागही वाढवण्यात येणार आहे. जिल्हा नियोजन समित्यांच्या स्थापनेची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यासाठी संबंधित सदस्यांची नावे देण्याबाबतही चर्चा झाली. डीपीडीसीच्या कामकाजाला गती देण्यासाठी सर्वांनी लवकर कार्यरत होणे आवश्यक असल्याचे भुजबळांनी सांगितले. तसेच विविध महामंडळांवरील नियुक्त्याही लवकर करण्याचा विचार सुरू असून, त्यासाठी सभासदांच्या नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे. महायुतीतील तिन्ही पक्षांनी सरकारच्या कामकाजात समन्वय राखावा आणि सार्वजनिक स्तरावर एकमेकांविरोधात टीका-टिप्पणी टाळावी, असा संदेश भुजबळांच्या वक्तव्यातून देण्यात आला. सरकारमधील मतभेद चर्चेतून सोडवावेत, मात्र मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांविरोधात मर्यादा ओलांडून आरोप झाल्यास तिन्ही पक्ष एकत्रित भूमिका घेतील, असा इशारा त्यांनी दिला.

बाळासाहेबांच्या फोटोचा अपमान; पुण्यात ठाकरे गटाचा संताप



पुणे : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरील कथित आक्षेपार्ह मजकुराच्या निषेधासाठी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत पोस्टर फाडण्याच्या कृतीवरून आता राजकीय वाद निर्माण झाला आहे. या पत्रकार परिषदेदरम्यान शायना एन.सी. यांच्याकडून बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडला गेल्याचा आरोप करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ पुण्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने आक्रमक भूमिका घेत आंदोलन केले. एकनाथ शिंदे आणि शायना एन.सी. यांचे पोस्टर फाडून ते मुठा नदीत विसर्जित करत ठाकरे गटाने निषेध नोंदवला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी मुंबईत सोनिया गांधी लिखित *'Belonging — A Journey of Love'* या पुस्तकातील मजकुरावर आक्षेप घेत पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पुस्तकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान करणारा मजकूर असल्याचा आरोप शिंदे गटाकडून करण्यात आला. याच निषेधार्थ पत्रकार परिषदेत पुस्तकाच्या काही प्रती आणि त्यातील पाने फाडण्यात आली. यावेळी प्रवक्त्यांकडून पुस्तक फाडण्याची कृती सुरू असताना शायना एन.सी. यांच्याकडून बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो असलेले पान फाडल्याचा आरोप झाला. या प्रकारानंतर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली. शिवसेना ठाकरे गटाने या कृतीचा निषेध करत शिंदे गटाला लक्ष्य केले. मुंबईतील पत्रकार परिषदेत घडलेल्या प्रकाराचे पडसाद पुण्यात उमटले. ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी एकनाथ शिंदे आणि शायना एन.सी. यांच्याविरोधात आंदोलन केले. दोघांचे पोस्टर फाडून त्यांचा निषेध करण्यात आला. त्यानंतर फाडलेल्या पोस्टरचे मुठा नदीत विसर्जन करत संताप व्यक्त करण्यात आला.बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडल्याचा आरोप हा आंदोलनामागील प्रमुख मुद्दा होता. या घटनेमुळे ठाकरे आणि शिंदे गटातील राजकीय संघर्ष पुन्हा चर्चेत आला आहे.

मुंबई विमानतळावर स्पाइसजेटचा खोळंबा; ९ तासांच्या विलंबाने प्रवासी त्रस्त

मुंबई : मुंबई विमानतळावर मंगळवारी संध्याकाळी स्पाइसजेटच्या अनेक विमानांना विलंब झाला. संध्याकाळी 7 वाजल्यानंतर एअरलाइनचे एकही विमान रवाना झाले नाही. त्यामुळे शेकडो प्रवाशांना सुमारे 9 तास प्रतीक्षा करावी लागली. मात्र, काही विमानांनी बुधवारी पहाटे सुमारे 4 वाजता उड्डाण केले. प्रवाशांचा आरोप आहे की, एअरलाइनने त्यांना विलंबाचे कारण आणि उड्डाणाच्या नवीन वेळेची योग्य माहिती दिली नाही. त्यामुळे संतप्त प्रवाशांनी तिकीट काउंटरवर गोंधळ घालत घोषणाबाजी केली. दरम्यान, स्पाइसजेटने प्रभावित प्रवाशांना परतावा देण्याची ऑफर दिली असून, 7 दिवसांच्या आत पैसे खात्यात जमा करण्याचे आश्वासन दिले आहे. याआधी सोमवारीही मुंबई विमानतळाच्या टर्मिनल-1 वर स्पाइसजेटच्या विमानांबाबत अडचणी निर्माण झाल्या होत्या। प्रवाशांनी आरोप केला होता की, त्यांना टर्मिनलमध्ये प्रवेश दिला गेला नाही आणि विमानाच्या स्थितीची माहितीही मिळाली नाही. सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या अव्यवस्थेनंतर विमानतळ प्रशासनाने प्रवाशांना घरातून निघण्यापूर्वी विमानाची स्थिती तपासण्याचा सल्ला दिला होता. दरम्यान, दिल्ली विमानतळानेही 13 नोव्हेंबर रोजी स्पाइसजेटच्या विमानांना विलंब होण्याची आणि ती रद्द होण्याची शक्यता असल्याने सूचना जारी केली होती. DGCAच्या सप्टेंबरमधील आकडेवारीनुसार, स्पाइसजेटची 20% पेक्षा जास्त नियोजित विमाने रद्द झाली. तर, वेळेवर उड्डाण करण्याचे प्रमाण केवळ 16.6% राहिले. या काळात सुमारे 36 हजार प्रवाशांना दोन तासांपेक्षा जास्त विलंबाचा सामना करावा लागला, तर 21,700 प्रवासी विमाने रद्द झाल्यामुळे प्रभावित झाले. वृत्तानुसार, स्पाइसजेटच्या ताफ्यात आता केवळ 12 ते 13 विमाने उरली आहेत. याचा परिणाम कंपनीच्या व्यवसायावर झाला असून सप्टेंबरमध्ये देशांतर्गत विमान वाहतूक बाजारपेठेतील तिचा हिस्सा घटून 0.6% राहिला. सतत उड्डाणे रद्द होणे आणि विलंबामुळे प्रवाशांच्या अडचणी वाढत आहेत. दरम्यान, मुंबई विमानतळावरील ताज्या घटनेवर कंपनीने अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य केलेले नाही. स्पाइसजेटच्या सतत बिघडत चाललेल्या उड्डाण सेवांमागे कंपनीच्या आर्थिक आणि परिचालनविषयक अडचणीही समोर आल्या आहेत.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १९ नोव्हेंबर २०२६

ज्यांचे कडे पुरावा- वंशावळ ते कुणबी पण ज्यांचे कडे काहीच नाही त्यांचे काय? राजेंद्र दाते पाटील यांचा सवाल

छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी) येथे मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने राज्य स्तरीय मराठा आरक्षण कायदेशीर व घटनात्मक मंथन परिषदेचे आयोजन रिगल लॉन, देवळाई चौक छत्रपती संभाजीनगर येथे पार पडले. परिषदेची सुरुवात छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दिप प्रज्वलन मातृशक्ती महिलांचे हस्ते करण्यात आले.या परिषदेत मुख्य बीज भाषण करतांना ज्यांचे कडे पुरावा आहे, ते कुणबी म्हणुन प्रमाणपत्र काढु शकतील त्याला पडताळणी करून घेऊ शकतील परंतु ज्यांची वंशावळ जुडत नाही काही पुरावा नाही त्यांचे काय? असा जळजळीत सवाल उच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ते व जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला. पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सादरीकरण देश भरातील सर्वोच्च न्यायालये घटनापीठाचे १२३ पेक्षा जास्त असे विविध न्याय निवाडे आरक्षणासाठी कसे घातक आहेत हे त्यांनी उपस्थिता समोर सादरीकरण करून भूमिका स्पष्ट करून ५५ पेक्षा अधिकचेपाचं, सात, नऊ, अकरा व अगदी तेरा न्यायमूर्ती असलेल्या घटना पीठचे व सर्वोच्च न्यायालयाचे न्याय निवाडे जे कि कुणबी आरक्षण आणि एसईबीसी आरक्षणा बाबत तरतूद करणारे ठरू शकतील याचे देशातील पाहिले वाहिले पी पी टी सादरीकरण त्यांनी केले असुन या सुधारीत सादरी कारणाचे निरीक्षण मुख्यमंत्री -उपमुख्यमंत्री यांचे सह शासनाच्या कायदा विभाग इतर विभागाने करावे अशीही मागणी त्यांनी केली आहे पुढे ते म्हणाले कि, ओबीसी सारख्या सर्व सवलती " केजी ते पीजी " स्तरा पर्यंत देणारे सुधारीत शासनादेश तथा जी आर तात्काळ काढावा, प्रलंबित नियुक्त्या, आंदोलकवरील गुन्हे वापस घेणे,शहीद स्व.काकासाहेब शिंदे यांचे नावाने शहीद स्मारक करणे,सारथी साठी सर्वच प्रलंबित देयके संशोधकांना आदा करणे, स्व आण्णासाहेब पाटील महामंडळाच्या व्याज परताव्यासाठी निधी देणे आदी मागण्या त्यांनी सविस्तर पणे मांडल्या. रमेश केरे व जावळे काय म्हणाले? रनेश केरे या प्रसंगी बोलतांना म्हणाले कि,शास्वत आरक्षण मिळण्यासाठी असणाऱ्या तरतुदीवर व्यापक चर्चा या मंथन परिषदेत झाली असुन येत्या डिसेंबरपासून तुळजापूर येथून जागरण गोंधळ करून मराठा आरक्षण जनजागरण यात्रा काढण्याच्या मानस त्यांनी जाहीर केला.अखिल भारतीय छावा मराठा संघटनेचे अध्यक्ष नानासाहेब जावळे म्हणाले कि,मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी शासनाने नेमलेल्या समित्या व आयोग यांच्या माध्यमातून समाजाची दिशाभूल व फसवणूककरण्यात आली आहे,त्यामुळे मराठा आरक्षणा बाबत समाजा मध्ये जनजागरण करण्या साठी यात्राकाढण्यात येणार आहे. हैदराबाद गॅझेटच्या नावाखाली सुद्धा फसवणूक झाली असुन हैदराबाद गॅझेट, ईसीबीसी आरक्षण देण्याच्या घोषणा सरकारने पूर्ण केलेल्या नाहीत. हैदराबाद गॅझेटच्या नावा खाली समाजाची फसवणूक करण्याचे काम या सरकारने केल्याचा आरोप रमेश केरे आणि नानासाहेब जावळे यांनी केला. मराठवाड्यातील अभ्यासकांची मुंबईत बैठक लावण्याचे आश्वासनही शासनाने पुर्ण केले नसुन न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ते व जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे सुधारीत पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन मुख्यमंत्र्यांनी पाहण्यासाठी तात्काळ वेळ निश्चित करावा,५८ लाख नोंदी सापडल्याचा दावाही सरकारने केला आहे,मात्र या नोंदी राज्यभरातील आहेत की मराठवाड्यातील हे सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणीही त्यांनी केली. मात्र या नोंदी राज्यभरातील आहेत की मराठवाड्यातील हे सरकारने स्पष्ट करावे.छावा मराठा संघटनेचे अध्यक्ष किशोर चव्हाण बोलतांना म्हणाले कि, मराठवाड्या तील मराठा समाजाचे हक्काचे आरक्षण सरकारने परत देऊन अनुशेष भरावा कारण मराठवाडा हा महाराष्ट्रात येण्या पूर्वी हैदराबाद स्टेट चा भाग होता. भाषा प्रांत रचनेत मराठी भाषेचा मराठवाडा भाग १ मे १९६० ला महाराष्ट्रात विलीन झाला. महाराष्ट्रात येण्यापूर्वी मराठवाड्यातील मराठा समाज ओ.बी.सी. मध्ये होता. महाराष्ट्र सरकारने हैदराबाद स्टेट मधून आलेले एस.सी./ एस.टी.व ओ.बी.सी. यांना महाराष्ट्र सरकारने त्या त्या प्रवर्गात समावेश केला आहे. फक्त मराठवाड्यातील मराठा समाजाचा ओ.बी.सी. समावेश केला नाही. म्हणून मराठवाड्यातील मराठा समाजाची मागणी आहे की मराठा समाजाच्या हक्काचे ओ.बी.सी.मध्ये समावेश करून अनुशेष सुद्धा भरून काढावा १४ऑगस्ट २०२६ रोजी मंत्रिमंडळ उपसमिती चे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील व सर्व सदस्य यांनी मुंबई येथे बैठक घेतली होती. मराठवाड्याचा आरक्षणाचा प्रश्न वेगळा असून लवकरच मुंबई येथे मराठवाड्या तील मराठा आरक्षणा विषयी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल अशी जाहीर केले होते.ती बैठक सरकारने लवकरात लवकर घ्यावी. परिषदेत आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील,नाशिकचे विलास पांगरकर, किशोर चव्हाण, मराठा सेवा संघांचे प्रा. शिवानंद भानुसे,धुळेचे लक्ष्मणबापु सिरसाट, भीमराव मराठे,बुलढाणाचे प्रदीप बिल्लोरे,गणेशकदम, योगेश केवारे, बीड गणेश कदम, टीम मुंबईचे रामचंद्र शेडगे,अनिल सुर्वे, सुशील निकम,सूर्याजी सोनवले, नवी मुंबईचे किरण सोनवले,ठाणेचे दीपक गायकवाड,छावा संघटनेचे सुशील पाटील पायाळ, सातारचे पांडुरंग रोडे.नांदेडचे बाळासाहेब इंगळे, जालनाचे शरद देशमुख,पुणे येथील संतोष दळवी, आर्यन पाटील,हरिष शिंदे,संस्कार सामनकर, प्रथमेश झांजे पाटील आदींसह राज्यभरातील पदाधिकारी व समाज बांधवव भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अ. भा. मराठा महासंघाचे विभागीय अध्यक्ष प्रा गोपाल चव्हाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार राहुल पाटील यांनी व्यक्त केले.

स.भु. प्रशालेची सहल - पुस्तकांच्या गावात



छत्रपती संभाजीनगर :येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेतील इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीनिमित्त महाबळेश्वर जवळील भिलार या पुस्तकांच्या गावास भेट दिली. विद्यार्थ्यांनी भिलार गावातील जवळपास 30 ठिकाणांना भेट दिली. तेथील पुस्तके वाचण्याचा आनंद घेतला. विद्यार्थी वाचनात दंग होऊन गेले. वाचन संस्कृतीचे महत्त्व प्रकल्प कार्यालयातील श्री. राजेश जाधव यांनी विषद केले. यावेळी विद्यार्थ्यांना लघुपट दाखविण्यात आला. या अनोख्या गावात विद्यार्थी दंग होऊन गेले. कथा, कादंबरी, स्त्री साहित्य, शिवकालीन गडकिल्ले, विज्ञान, बालसाहित्य असे कितीतरी साहित्यप्रकारांची पुस्तके विद्यार्थ्यांनी हाताळली . प्रशालेचे मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ यांच्या मार्गदर्शनाने व अनिल भिलारे, विजय पिंपळे, विजय पाताळयंत्री, संदीप घुगे, सीमा मुंदडा, दिपाली सोळंके, राजेश राठोड, संध्या चोले , अभिजीत जाधव यांच्या सहकार्याने शैक्षणिक सहलीतील भिलार गावाला भेट यशस्वी झाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संजय खंबायते यांनी घेतली सदिच्छा भेट



कन्नड (अरुण थोरात) : दीपावली पाडव्याच्या शुभमुहूर्तावर भारतीय जनता पार्टीचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या वतीने शेतकरीहिताच्या विविध निर्णयांबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.दीपावलीनिमित्त शेतकऱ्यांना देण्यात आलेली पाच हजार रुपयांची आर्थिक मदत, कर्जमाफीच्या माध्यमातून मिळणारा दिलासा तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या थकीत वीजबिलांच्या माफीसंदर्भातील निर्णयांचे खंबायते यांनी कौतुक केले. शेतकऱ्यांच्या कष्टाचे आणि ग्रामीण कृषी संस्कृतीचे प्रतीक असलेली बैलगाडी भेट देऊन त्यांनी मुख्यमंत्र्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे, जालना जिल्हा भाजपाध्यक्ष तथा आमदार नारायण कुचे, जिल्हासरचिटणीस सुभाष काळे उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयांमुळे बळीराजाला दिलासा मिळेल, असा विश्वास संजय खंबायते यांनी व्यक्त केला. शेतकरी सुखी तर महाराष्ट्र समृद्ध या भावनेतून सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असल्याचेही त्यांनी सांगितले.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १९ नोव्हेंबर २०२६

कोंबडेदादा

कोंबडेदादा कोंबडेदादा
भल्या पहाटे आरवतोस
लवकरच उठण्याचा
जणू संदेश देतोस

डोईवर लाल तुरा
शोभून दिसतो छान
पांढराशुभ्र तुझा रंग
अन् ऐटदार मान

अंगावर तुझ्या
अनेक पंखांचा भार
डोळे छोटे छोटे
शेपूट झुपकेदार

इकडे तिकडे भटकून
धान्य बिया खातो
अंधार पडला की
खुराडयात जाऊन बसतो

खाली वर मान करून
पटापट देतोस बांग
तू उंच उडत नाहीस
कारण मला सांग ?



- सौ.कल्पना चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ

माणसं दूर जातात

जेव्हा खेळ भावनांचा होतो
तेव्हा माणसं दूर जातात.
दूर गेलेली माणसंच पुन्हा,
जवळ येताना भाव खातात. १

म्हणून म्हणतो माणसांनो,
प्रत्येकाने भावनांना जपावे.
माणूस म्हणून जगतांना,
एकमेकाच्या मनात लपावे. २

भावना असतात खूप नाजूक,
कधी कुणाला लेखू नये कमी.
नाहीतर नाते टिकण्याची,
मिळत नसते जगतांना हमी. ३

हळुवार भावनेतून हावभाव,
सदा मनात बदलत असतात.
भावनेशी एकरूप होताच,
माणसं कायम मनात बसतात. ४

भावनेतून माणसाचे वर्तन,
घेत असते हळूहळू आकार.
भावना परिपक्व होताच,
स्वप्न होत असतात साकार. ५



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

दौलताबाद पोलिसांची धडक कारवाई; टाटा कंपनीच्या नावाने बनावट DEF द्रव तयार करणारा प्रकार उघड



दौलताबाद (जावेद अहमद) : टाटा मोटर्स कंपनीच्या नावाचा व लोगोचा अनधिकृत वापर करून बनावट DEF (डिझेल एक्झॉस्ट फ्लुइड) द्रवाची निर्मिती व विक्री करण्याचा प्रकार दौलताबाद पोलिसांनी उघडकीस आणला आहे. दौलताबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिंधी सिरसगाव येथे पोलिसांनी संयुक्त छापा टाकून सुमारे ८ लाख १० हजार २० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, Protect IP India Pvt. Ltd. कंपनीचे मुख्य तपास अधिकारी सतार मुनाफ शेख (वय ४३, रा. निगडी, पुणे) यांनी दि १७ मंगळवारी दौलताबाद पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. टाटा मोटर्स कंपनीच्या DEF उत्पादनाच्या नावाने बनावट माल तयार करून त्यावर कंपनीचे नाव व लोगो असलेले स्टिकर लावून त्याची विक्री केली जात असल्याची माहिती त्यांना मिळाली होती.यावरून दि १७ मंगळवारी रोजी दौलताबाद पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे मार्गदर्शनाखाली दौलताबाद पोलीस उपनिरीक्षक अजित दगडखेरे, पोलीस अंमलदार खुशाल पाटील,बंडू गोरे,सुमेध पवार,अविनाश बरवंट,मरकड, संदीप पवार यांच्या संयुक्त पथकाने सिंधी सिरसगाव येथे छापा टाकला. यावेळी आरोपी जगदीश देदाराम चौधरी (वय २७, रा. आडेल, ता. नोखडा, जि. बिकानेर, राजस्थान) याच्याकडून टाटा मोटर्स DEF असे प्रिंट असलेले प्लास्टिकचे बकेट, बनावट स्टिकर तसेच एक महिंद्रा कंपनीची बोलेरो मॅक्स पिकअप गाडी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या कारवाईत १० लिटर क्षमतेचे २११ बकेट, टाटा मोटर्स कंपनीच्या नावाचे ९९ स्टिकर, २० लिटर क्षमतेचे एकूण ३९ बकेट आणि महिंद्रा बोलेरो मॅक्स पिकअप वाहन असा एकूण ८ लाख १० हजार २० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.याप्रकरणी दौलताबाद पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३२४/२०२६ अन्वये कॉपीराइट कायदा १९५७ मधील कलम ६३ व ६५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजित दगडखैर करीत आहेत.

सुधारित वेतन श्रेणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा निर्णय लढा



रावेर जळगाव (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत असलेले सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी आपल्या प्रलंबित न्याय्य मागण्यांसाठी दि. १७ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी बेमुदत संपावर गेले आहेत. मा. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी गेल्या २१ महिन्यांपासून शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करूनही ठोस निर्णय न झाल्याने अखेर कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे.मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.३१ जानेवारी २०२५ रोजी दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविला आहे. मात्र, तब्बल २१ महिने उलटूनही शासन स्तरावर या प्रस्तावाबाबत कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ गट क, महाराष्ट्र ज्युडिशियल स्टेनोग्राफर्स असोसिएशन, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन बेलिफ कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्य न्यायालयीन गट ड कर्मचारी महासंघ आदी संघटनांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊन व विविध माध्यमांतून पाठपुरावा करूनही कर्मचाऱ्यांच्या पदरी केवळ आश्वासनेच पडली आहेत. आंदोलनाचे टप्पे आणि बेमुदत संपाचा निर्णयसमान काम समान वेतनाच्या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी दि. १६ सप्टेंबर २०२६ पासून सनदशीर व लोकशाही मार्गाने आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाच्या पहिल्या टप्यात दिनांक १६ सप्टेंबर रोजी राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले. त्यानंतर दिनांक १६ व १७ ऑक्टोबर रोजीही काळ्या फिती लावून निषेध नोंदविण्यात आला. दि. १७ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही या लढ्याला सक्रिय पाठिंबा देत जीएस ग्राउंडवर एक दिवसीय धरणे आंदोलन केले. त्यानंतर दि.५ नोव्हेंबर २०२६ रोजी राज्यव्यापी सामूहिक रजा आंदोलनाची हाक देण्यात आली होती. मात्र, मा. उच्च न्यायालयाने निर्गमित केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने कोणतीही तांत्रिक किंवा प्रशासकीय अडचण निर्माण होऊ नये, या हेतूने सदर रजा आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र, शासनाकडून मागण्यांबाबत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने आंदोलनाचा पुढील आणि निर्णायक टप्पादि. १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारण्यात येत आहे.न्यायालयीन कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण सध्या महाराष्ट्रातील दुय्यम न्यायालयांमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत अपुरी आहे. अनेक न्यायालयांमध्ये न्यायालयाच्या स्थापनेपासून आजतागायत मंजूर आकृतिबंधानुसार आवश्यक कर्मचारी पदेही उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. परिणामी, इतर न्यायालयांतील कर्मचाऱ्यांची अतिरिक्त स्वरूपात नियुक्ती करून कामकाज चालविले जात आहे. त्यामुळे ज्या न्यायालयांतून कर्मचारी अतिरिक्त म्हणून पाठविण्यात आले आहेत, त्या न्यायालयांमध्येही मनुष्यबळाची कमतरता निर्माण होऊन संपूर्ण न्यायालयीन यंत्रणेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. सन २००५ पासून न्यायालयीन कामकाजात संगणक प्रणालीचा वापर सुरू झाला असला, तरी प्रत्यक्षात अनेक कामे संगणकीय तसेच मॅन्युअल अशा दोन्ही पद्धतीने करावी लागत आहेत. परिणामी, एकाच कामासाठी दुप्पट वेळ आणिदुप्पट श्रम खर्च करावे लागत आहे. दिवाणी व फौजदारी खटल्यांच्या संख्येत दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत असताना कर्मचारी संख्या मात्र त्या प्रमाणात वाढविण्यात आलेली नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेनंतरही थांबून तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीदेखील कार्यालयात उपस्थित राहून कामकाज पूर्ण करावे लागत आहे. शेट्टी आयोगाच्या शिफारशींचीही अद्याप पूर्ण अंमलबजावणी नाही मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०७ ऑक्टोबर २००९ रोजी दिलेल्या आदेशानंतरही मा. शेट्टी आयोगाच्या शिफारशींची संपूर्ण अंमलबजावणी अद्याप झालेली नाही, ही बाबही न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या असंतोषाला कारणीभूत ठरत आहे. शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन न्याय्य निर्णय घ्यावा, अन्यथा मागणी मान्य होईपर्यंत राज्यातील ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर ठाम राहतील, असा निर्धार कर्मचारी संघटनांनी व्यक्त केला आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १९ नोव्हेंबर २०२६

राष्ट्रीय एकात्मता : राष्ट्राच्या सामर्थ्याचा आणि प्रगतीचा आधार - डॉ. राजेंद्र बगाटे

भारत हा विविधतेने नटलेला आणि सांस्कृतिक समृद्धीचा वारसा लाभलेला देश आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, पंथ, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती यांचे सहअस्तित्व हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. देशाच्या एका भागातील भाषा, वेशभूषा, खाद्यसंस्कृती आणि परंपरा दुसऱ्या भागापेक्षा वेगळ्या असल्या, तरी या सर्वांना जोडणारा समान धागा म्हणजे भारतीयत्वाची भावना होय. ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात देशाविषयी आपलेपणा, परस्परांविषयी आदर, सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक जबाबदारी निर्माण करते. विविधतेचा स्वीकार करून एकतेची भावना जपणे, प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेचा सन्मान करणे आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. राष्ट्रीय एकात्मता ही केवळ राजकीय किंवा भौगोलिक संकल्पना नसून ती सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक आणि वैचारिक पातळीवर विकसित होणारी व्यापक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी १९ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा केला जातो.राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करताना विविधतेतील एकतेची संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे देशातील सर्व नागरिकांनी आपापली स्वतंत्र ओळख विसरून एकसारखे जीवन जगणे नव्हे. प्रत्येकाला आपली भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरा जपण्याचे स्वातंत्र्य असतानाच इतरांच्या वेगळेपणाचा आदर करण्याची मानसिकता विकसित होणे म्हणजे खरी राष्ट्रीय एकात्मता होय. विविधतेचे अस्तित्व मान्य करून त्यातून परस्पर विश्वास, सहकार्य, बंधुभाव आणि समान राष्ट्रीय जाणीव निर्माण करणे हे तिचे वैशिष्ट्य आहे. देशाच्या कोणत्याही भागातील नागरिकाला इतर प्रदेशातील नागरिक परका वाटू नये, तर सर्वजण एका व्यापक राष्ट्रीय कुटुंबाचे घटक आहेत, अशी भावना निर्माण झाली पाहिजे. ही भावना केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी व्यक्त होऊन चालणार नाही, तर दैनंदिन सामाजिक व्यवहारातही तिचे प्रतिबिंब दिसले पाहिजे.भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासामध्ये राष्ट्रीय एकात्मतेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देशातील विविध जाती, धर्म, भाषा आणि प्रदेशांतील नागरिक एकत्र आले होते. त्यांची सामाजिक पार्श्वभूमी आणि जीवनपद्धती वेगवेगळी असली, तरी परकीय सत्तेपासून मुक्त होऊन स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचे ध्येय समान होते. स्वातंत्र्यलढ्याने भारतीय समाजाला त्याग, सहकार्य, सामूहिक संघर्ष आणि देशप्रेमाची शिकवण दिली. या संघर्षामध्ये विविध समाजघटकांनी दिलेले योगदान भारतीय राष्ट्रीयत्वाच्या जडणघडणीसाठी महत्त्वपूर्ण ठरले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशासमोर राष्ट्रीय अखंडता टिकविणे, लोकशाही व्यवस्था मजबूत करणे, सामाजिक विषमता दूर करणे आणि सर्वसमावेशक विकास साधणे ही आव्हाने होती. या सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची भावना अत्यावश्यक ठरली.भारतीय संविधान हा राष्ट्रीय एकात्मतेचा सर्वांत महत्त्वाचा आधार आहे. संविधानाच्या उद्देशिकेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना विशेष स्थान देण्यात आले आहे. ही मूल्ये भारतीय लोकशाहीच्या पायाभूत तत्त्वांबरोबरच राष्ट्रीय एकात्मतेची दिशादर्शक तत्त्वे आहेत. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायामुळे प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळते. विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म आणि उपासना यांचे स्वातंत्र्य व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे रक्षण करते. कायद्यापुढील समानता नागरिकांमधील भेदभावाला प्रतिबंध करते, तर बंधुतेची भावना व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व अखंडता टिकविण्यास मदत करते. त्यामुळे संविधानाचे पालन करणे, संविधानिक संस्थांचा आदर करणे आणि लोकशाही मूल्यांचे आचरण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. संविधानातील मूल्ये केवळ शासकीय व्यवस्था किंवा न्यायालयीन प्रक्रियेपुरती मर्यादित न राहता ती समाजाच्या सामूहिक जीवनात रुजली पाहिजेत.राष्ट्रीय एकात्मतेच्या जडणघडणीत सामाजिक समतेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय समाजामध्ये जातीय भेदभाव, अस्पृश्यता, सामाजिक उच्चनीचता आणि आर्थिक विषमता यांसारख्या समस्या ऐतिहासिकदृष्ट्या अस्तित्वात राहिल्या आहेत. या विषमतेमुळे समाजातील अनेक घटकांना शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या संधींपासून वंचित राहावे लागले. अशा परिस्थितीत केवळ एकतेच्या घोषणा देऊन सामाजिक एकात्मता साध्य होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान, समान संधी आणि न्याय्य वागणूक मिळणे आवश्यक आहे. जात, धर्म, लिंग, भाषा, प्रदेश किंवा आर्थिक परिस्थिती यांच्या आधारावर कोणताही भेदभाव होता कामा नये. सामाजिक न्यायाची प्रभावी अंमलबजावणी, वंचित घटकांचे सक्षमीकरण आणि दुर्बल समूहांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेणे यांमधून राष्ट्रीय एकात्मतेचा पाया मजबूत होतो. समाजातील प्रत्येक घटकाला प्रतिष्ठेने जगण्याची संधी मिळणे ही सशक्त राष्ट्रनिर्मितीची पूर्वअट आहे.धार्मिक विविधता ही भारतीय समाजाची महत्त्वपूर्ण ओळख आहे. भारतामध्ये विविध धर्मांचे, पंथांचे आणि श्रद्धापरंपरांचे नागरिक एकत्रितपणे राहतात. प्रत्येक धर्माची स्वतंत्र उपासना पद्धती, तत्त्वज्ञान, सांस्कृतिक परंपरा आणि जीवनविषयक दृष्टिकोन आहे. या विविधतेमुळे भारतीय संस्कृती अधिक समृद्ध झाली आहे. मात्र, धर्माच्या नावावर द्वेष, असहिष्णुता, पूर्वग्रह आणि संघर्ष निर्माण होणे हे राष्ट्रीय एकात्मतेसमोरील गंभीर आव्हान आहे. कोणत्याही धर्माचा अवमान न करता प्रत्येकाच्या श्रद्धेचा आदर करणे ही सुसंस्कृत समाजाची मूलभूत अपेक्षा आहे. धार्मिक श्रद्धा ही व्यक्तीच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग असली, तरी सार्वजनिक जीवनामध्ये मानवी मूल्ये, परस्पर सन्मान आणि सामाजिक सलोखा यांना प्राधान्य मिळाले पाहिजे. विविध धर्मांच्या नागरिकांमध्ये संवाद वाढविणे, सामूहिक सामाजिक उपक्रम राबविणे आणि एकमेकांच्या सण-उत्सवांमध्ये सहभागी होणे यांमुळे परस्पर विश्वास दृढ होतो. धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव यांमुळे राष्ट्रीय एकात्मतेला स्थैर्य प्राप्त होते.भाषिक विविधता ही भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग आहे. देशातील विविध राज्यांमध्ये अनेक भाषा आणि बोली बोलल्या जातात. प्रत्येक भाषेमध्ये त्या प्रदेशाचा इतिहास, लोकजीवन, साहित्य, ज्ञानपरंपरा आणि सांस्कृतिक अनुभव सामावलेले आहेत. मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, गुजराती, पंजाबी, आसामी आणि इतर अनेक भाषांनी भारतीय साहित्य व संस्कृती समृद्ध केली आहे. कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसून प्रत्येक भाषेला तिचे स्वतंत्र महत्त्व आहे. मातृभाषेचा अभिमान बाळगणे स्वाभाविक असले, तरी इतर भाषांचा अवमान करणे योग्य नाही. भाषेच्या आधारावर प्रादेशिक श्रेष्ठत्वाची भावना निर्माण होऊ नये. विविध भारतीय भाषांमधील साहित्याचे अनुवाद, भाषिक शिक्षण, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि आंतरराज्यीय संवाद यांमुळे परस्पर समज वाढते. भाषा ही माणसांना जोडणारी शक्ती ठरली पाहिजे, विभागणी करणारे साधन नव्हे.राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी प्रादेशिक समतोल आणि सर्वसमावेशक विकासालाही विशेष महत्त्व आहे. भारतातील विविध राज्ये आणि प्रदेश नैसर्गिक साधनसंपत्ती, भौगोलिक परिस्थिती, औद्योगिक विकास, शेती, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी या बाबतीत वेगवेगळ्या स्थितीत आहेत. काही प्रदेशांमध्ये वेगाने विकास होत असताना काही भागांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव जाणवतो. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम, डोंगराळ आणि सीमावर्ती भागांतील नागरिकांना शिक्षण, आरोग्य, वाहतूक, पिण्याचे पाणी आणि रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध होत नाहीत. विकासातील ही विषमता दूर करण्यासाठी सर्व प्रदेशांना समान महत्त्व देणे आवश्यक आहे. स्थानिक गरजांनुसार विकासाचे नियोजन, पायाभूत सुविधांची उभारणी, रोजगारनिर्मिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आरोग्यसेवांचा विस्तार यांमधून प्रादेशिक असमतोल कमी करता येतो. एखाद्या प्रदेशाचा विकास म्हणजे संपूर्ण देशाचा विकास, ही जाणीव प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण झाली पाहिजे.शिक्षण हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव, सहिष्णुता आणि लोकशाही मूल्यांची रुजवण होते. शाळा आणि महाविद्यालये ही केवळ ज्ञानप्राप्तीची केंद्रे नसून सामाजिक समरसता आणि जबाबदार नागरिकत्व घडविण्याची महत्त्वपूर्ण ठिकाणे आहेत. विविध जाती, धर्म, भाषा आणि आर्थिक स्तरांतील विद्यार्थी एकत्र शिकतात, खेळतात आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात. या प्रक्रियेत त्यांच्यामध्ये परस्पर सहकार्य, मैत्री आणि समानतेची भावना विकसित होते. अभ्यासक्रमामध्ये भारतीय स्वातंत्र्यलढा, संविधानिक मूल्ये, सामाजिक सुधारणा, विविध भारतीय संस्कृती, लोकशाही आणि मानवी हक्क यांचा समावेश असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षाभिमुख ज्ञान न देता जबाबदार नागरिकत्वाची जाणीव करून दिली पाहिजे. राष्ट्रीय सण, संविधान दिन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि आंतरराज्यीय विद्यार्थी देवाणघेवाण यांच्या माध्यमातून एकात्मतेची भावना अधिक दृढ करता येते.आजच्या काळात युवकांची भूमिका राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. भारत हा तरुण लोकसंख्येचा देश असल्यामुळे देशाच्या वर्तमान आणि भविष्याची दिशा ठरविण्यात युवकांचा मोठा वाटा आहे. युवकांमध्ये ऊर्जा, कल्पकता, तंत्रज्ञानाची जाण आणि परिवर्तनाची क्षमता आहे. या क्षमतेचा उपयोग समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी, सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी आणि विकासात्मक उपक्रमांना गती देण्यासाठी झाला पाहिजे. युवकांनी जातीय आणि धार्मिक पूर्वग्रहांपासून दूर राहून विवेकपूर्ण विचार स्वीकारणे आवश्यक आहे. समाजमाध्यमांवरील अपप्रचार, द्वेषपूर्ण संदेश आणि अफवांना बळी न पडता माहितीची सत्यता तपासण्याची सवय त्यांनी विकसित केली पाहिजे. रक्तदान, पर्यावरण संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, ग्रामविकास आणि सामाजिक जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये युवकांचा सहभाग वाढल्यास समाजातील एकोपा अधिक दृढ होऊ शकतो. युवकांनी आपल्या वैयक्तिक प्रगतीबरोबरच समाजाच्या सामूहिक प्रगतीचाही विचार केला पाहिजे.महिलांचा सहभाग आणि सक्षमीकरण हेदेखील राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्वाचे परिमाण आहे. भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय विकासात महिलांचे योगदान मोठे आहे. तथापि, आजही अनेक महिलांना लिंगभेद, हिंसाचार, असुरक्षितता, आर्थिक परावलंबित्व आणि सामाजिक बंधनांचा सामना करावा लागतो. महिलांना समान शिक्षण, रोजगार, निर्णयप्रक्रियेतील सहभाग आणि सुरक्षित सामाजिक वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ग्रामीण आणि आदिवासी महिलांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे, महिला बचत गटांना प्रोत्साहन देणे, नेतृत्वक्षमता विकसित करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील त्यांचा सहभाग वाढविणे या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. समाजातील निम्म्या लोकसंख्येला समान प्रतिष्ठा आणि संधी नाकारून राष्ट्रीय एकात्मतेची कल्पना पूर्ण होऊ शकत नाही. महिला सक्षमीकरणामुळे कुटुंब, समाज आणि राष्ट्र या तिन्ही स्तरांवर सकारात्मक परिवर्तन घडते.ग्रामीण आणि आदिवासी समाजाचा राष्ट्रीय एकात्मतेतील सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. भारताच्या ग्रामीण जीवनामध्ये शेती, पशुपालन, ग्रामोद्योग, लोककला आणि पारंपरिक ज्ञानव्यवस्थांचा मोठा वाटा आहे. आदिवासी समाजाने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषा, नृत्य, संगीत, लोकपरंपरा, निसर्गाशी असलेले नाते आणि सामुदायिक जीवनपद्धती यांद्वारे भारतीय संस्कृतीला समृद्ध केले आहे. मात्र, विकासाच्या प्रक्रियेत या समाजांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष होता कामा नये. त्यांच्या जमिनी, जंगल, जलस्रोत, पारंपरिक उपजीविका आणि सांस्कृतिक अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाला केवळ विकास योजनांचा लाभार्थी न मानता विकास प्रक्रियेतील सक्रिय भागीदार म्हणून स्थान दिले पाहिजे. त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचा सन्मान, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभाग आणि शिक्षण व रोजगाराच्या संधींचा विस्तार यांमधून राष्ट्रीय एकात्मता अधिक व्यापक आणि समावेशक बनू शकते.राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आधुनिक आव्हानांमध्ये जातीयवाद, धार्मिक कट्टरता, भाषिक संघर्ष, प्रादेशिक अस्मिता, आर्थिक विषमता आणि राजकीय ध्रुवीकरण यांचा समावेश होतो. लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीला आपले मत मांडण्याचा आणि राजकीय विचारधारा स्वीकारण्याचा अधिकार आहे. मात्र, मतभिन्नतेचे रूपांतर वैयक्तिक द्वेषात किंवा सामाजिक संघर्षात होता कामा नये. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सार्वजनिक जीवनातील नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींनी समाजामध्ये बंधुभाव आणि संवादाचे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. निवडणुकीच्या राजकारणात जात, धर्म आणि भाषेच्या आधारावर समाजाचे विभाजन करण्याचे प्रयत्न लोकशाहीच्या मूलभूत भावनेला बाधा पोहोचवतात. राजकीय मतभेद असले तरी राष्ट्रीय हित, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक सलोखा यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. मतभिन्नता ही लोकशाहीची ताकद आहे; परंतु परस्परांचा द्वेष करणे ही तिची कमजोरी आहे, याचे भान समाजाने ठेवले पाहिजे.समाजमाध्यमे आणि माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेला नवीन परिमाण प्राप्त झाले आहे. आज माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने होतो. देशातील एका भागात घडलेली घटना काही क्षणांत संपूर्ण देशापर्यंत पोहोचते. यामुळे विविध प्रदेशांतील लोकांना एकमेकांच्या समस्या, संस्कृती आणि सामाजिक परिस्थिती समजून घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. मात्र, याच माध्यमांचा गैरवापर करून खोट्या बातम्या, अफवा, धार्मिक तेढ निर्माण करणारे संदेश आणि द्वेषपूर्ण मजकूर पसरविला जातो. अशा माहितीमुळे समाजात गैरसमज, अविश्वास आणि संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे डिजिटल साक्षरता आणि माध्यम साक्षरता ही काळाची गरज बनली आहे. कोणतीही माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, विश्वासार्ह स्रोतांचा आधार घेणे आणि जबाबदारीने अभिव्यक्ती करणे आवश्यक आहे. समाजमाध्यमांचा उपयोग विविध संस्कृतींची ओळख करून देण्यासाठी, राष्ट्रीय प्रश्नांवर विधायक चर्चा घडविण्यासाठी आणि सामाजिक सहकार्य वाढविण्यासाठी केला पाहिजे.राष्ट्रीय एकात्मतेसाठी आर्थिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासदेखील तितकाच आवश्यक आहे. बेरोजगारी, गरिबी, महागाई, कुपोषण आणि शिक्षणातील असमानता या समस्या समाजामध्ये असंतोष निर्माण करू शकतात. आर्थिक संधींचे केंद्रीकरण झाल्यास समाजातील विविध घटकांमध्ये दरी वाढते. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागांतील आर्थिक अंतर कमी करणे, लघुउद्योगांना प्रोत्साहन देणे, कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि तरुणांसाठी रोजगारनिर्मिती करणे गरजेचे आहे. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न, असंघटित क्षेत्रातील कामगारांची सुरक्षितता, स्थलांतरित मजुरांचे प्रश्न आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे सक्षमीकरण यांना राष्ट्रीय विकासाच्या केंद्रस्थानी स्थान मिळाले पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाला राष्ट्राच्या प्रगतीमध्ये योगदान देण्याची संधी मिळाल्यास नागरिकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होते. विकासाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचविणे हेच राष्ट्रीय एकात्मतेचे व्यावहारिक स्वरूप आहे.राष्ट्रीय एकात्मतेमध्ये कला, साहित्य, संगीत, क्रीडा आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे. भारतातील लोककला, लोकनृत्य, लोकसंगीत, नाट्यपरंपरा आणि साहित्य यांमधून विविध समाजघटकांच्या जीवनाचे दर्शन घडते. महाराष्ट्रातील लावणी, पोवाडा, भारूड आणि आदिवासी नृत्यपरंपरा जशा सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहेत, तसेच देशातील इतर प्रदेशांतील कला आणि परंपराही राष्ट्रीय संस्कृतीला समृद्ध करतात. साहित्यिक आणि सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धा, युवक महोत्सव आणि आंतरराज्यीय सांस्कृतिक कार्यक्रम यांमधून विविधतेतील एकतेचा अनुभव घेता येतो. क्रीडा क्षेत्रामध्ये भाषिक, धार्मिक आणि प्रादेशिक भेद बाजूला ठेवून खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करतात. भारतीय संघाच्या विजयात प्रत्येक नागरिकाला आनंद होतो, कारण त्या क्षणी वैयक्तिक आणि प्रादेशिक ओळखींपेक्षा राष्ट्रीय ओळख अधिक महत्त्वाची ठरते. अशा अनुभवांमुळे सामूहिक अभिमान आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ होते.महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेमध्येही राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये खोलवर रुजलेली आहेत. संतपरंपरेने समता, मानवता, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यातून समता, शिक्षण, न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित झाले. महाराष्ट्रातील विविध जाती, धर्म, भाषा आणि सांस्कृतिक समूहांनी एकत्रितपणे सामाजिक जीवन समृद्ध केले आहे. राज्याच्या ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत विविध प्रदेशांतील लोक रोजगार, शिक्षण आणि व्यवसायाच्या निमित्ताने एकत्र राहतात. या सहअस्तित्वाला परस्पर आदर, सामाजिक सहकार्य आणि समान संधींची जोड मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची परंपरा राष्ट्रीय एकात्मतेच्या व्यापक ध्येयाला प्रेरणा देणारी आहे.राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करताना पर्यावरण संवर्धन आणि सामूहिक जबाबदारी यांचाही विचार करणे आवश्यक आहे. जलसंकट, हवामान बदल, जंगलतोड, प्रदूषण आणि नैसर्गिक आपत्ती या समस्या कोणत्याही एका जातीच्या, धर्माच्या किंवा प्रदेशाच्या मर्यादेत राहिलेल्या नाहीत. त्यांचा परिणाम संपूर्ण समाजावर होतो. त्यामुळे पर्यावरण संरक्षणासाठी सर्व नागरिकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. पाणी बचत, वृक्षारोपण, जैवविविधतेचे संरक्षण, स्वच्छता आणि शाश्वत विकास यांसारख्या उपक्रमांमध्ये सामूहिक सहभाग वाढविला पाहिजे. निसर्गाने निर्माण केलेल्या साधनसंपत्तीचा वापर जबाबदारीने करणे ही वर्तमान पिढीची भावी पिढ्यांप्रती असलेली नैतिक जबाबदारी आहे. पर्यावरणीय प्रश्नांवर एकत्रित कृती करण्याची भावना राष्ट्रीय एकात्मतेला अधिक व्यापक सामाजिक संदर्भ प्राप्त करून देते.राष्ट्रीय एकात्मता दिनाच्या निमित्ताने केवळ कार्यक्रमांचे आयोजन करून किंवा एकात्मतेच्या घोषणा देऊन आपली जबाबदारी संपत नाही. राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये दैनंदिन जीवनात रुजविणे अधिक महत्त्वाचे आहे. कुटुंबामध्ये मुलांना जातीय आणि धार्मिक भेदभावापासून दूर राहण्याची शिकवण देणे, शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देणे, सार्वजनिक ठिकाणी इतरांच्या अधिकारांचा आदर करणे आणि सामाजिक प्रश्नांवर संवेदनशीलतेने विचार करणे या कृतींमधून एकात्मतेचा पाया मजबूत होतो. स्थानिक स्वराज्य संस्थांनी विविध समाजघटकांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेतले पाहिजे. स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे, महिला संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सामाजिक सलोखा वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. नैसर्गिक आपत्ती किंवा इतर संकटांच्या काळात नागरिकांनी एकमेकांना मदत करण्याची भावना जपली पाहिजे. संकटाच्या वेळी माणुसकीला धर्म, जात आणि प्रदेशाची मर्यादा नसते, हे अनेक अनुभवांनी सिद्ध केले आहे.राष्ट्रीय एकात्मता ही स्थिर किंवा एकदाच साध्य होणारी गोष्ट नसून ती सातत्याने जपावी आणि विकसित करावी लागणारी सामाजिक प्रक्रिया आहे. काळानुसार समाजाच्या गरजा, आव्हाने आणि जीवनपद्धती बदलत असतात. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची मूल्येही नव्या परिस्थितीशी जोडून अधिक प्रभावीपणे रुजविण्याची आवश्यकता आहे. आधुनिक भारताला विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग, कृषी, आरोग्य आणि जागतिक व्यापार अशा विविध क्षेत्रांमध्ये प्रगती करायची आहे. ही प्रगती साधण्यासाठी देशातील नागरिकांमध्ये विश्वास, सहकार्य आणि सामूहिक जबाबदारीची भावना असणे आवश्यक आहे. सामाजिक संघर्ष आणि परस्पर द्वेषामध्ये समाजाची ऊर्जा खर्च होण्याऐवजी ती राष्ट्रनिर्मितीसाठी वापरली गेली पाहिजे. प्रत्येक नागरिकाने आपल्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांची जाणीव ठेवली, तर लोकशाही अधिक सक्षम होईल आणि राष्ट्रीय एकात्मतेचा पाया अधिक मजबूत बनेल.१९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा राष्ट्रीय एकात्मता दिन हा भारतीय समाजाला विविधतेतील एकतेची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे. या दिवसाचा खरा संदेश केवळ राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यापुरता मर्यादित न राहता तो आपल्या विचारांत, वर्तनात आणि सामाजिक व्यवहारात प्रतिबिंबित झाला पाहिजे. कोणत्याही व्यक्तीची ओळख तिच्या जाती, धर्म, भाषा किंवा प्रदेशावरून ठरविण्याऐवजी तिच्या माणूसपणाला आणि कर्तृत्वाला महत्त्व दिले पाहिजे. देशातील प्रत्येक नागरिकाला समान सन्मान, सुरक्षितता, न्याय आणि विकासाची संधी मिळणे हीच सशक्त राष्ट्राची खरी ओळख आहे. आपापल्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे जतन करताना परस्परांच्या अस्तित्वाचा आदर करणे, मतभिन्नतेतून संवाद साधणे आणि सामूहिक हिताला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रीय एकात्मता ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक भारतीयाची सामूहिक बांधिलकी आहे. विविधतेचा स्वीकार, सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता, भाषिक आदर, बंधुभाव आणि संविधाननिष्ठा या मूल्यांच्या आधारावरच विकसित, शांततापूर्ण आणि समृद्ध भारताची निर्मिती होऊ शकते. म्हणूनच 'विविधता ही आपली शक्ती आणि एकात्मता ही आपली ओळख' हा विचार प्रत्येक भारतीयाच्या मनात रुजला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेच्या बळावरच भारताची लोकशाही अधिक सुदृढ होईल आणि भावी पिढ्यांसाठी न्याय्य, समताधिष्ठित, सुरक्षित व प्रगत राष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न साकार होईल.

डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक,
समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल
— bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १९ नोव्हेंबर २०२६

जातिविरहित परिसराचे मिथक आणि त्यातून निर्माण होणारे असंतोष आनंद तेलतुंबडे

वर्षानुवर्षे आयआयटी (IIT) संस्थांनी विशेषतः वरिष्ठ स्तरावरील प्राध्यापकांच्या पदांवर आरक्षण लागू करण्यास विरोध केला किंवा त्याच्या अंमलबजावणीवर मर्यादा आणल्या. या संस्थांनी स्वतःला 'उत्कृष्टतेची केंद्रे' असल्याचे सांगत आरक्षणाला विरोध केला. मात्र, या भूमिकेचे परिणाम आजही स्पष्टपणे दिसून येत आहेत. १८ सप्टेंबर २०२६ रोजी आयआयटी मुंबईमधील बी.टेक. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी साहिल वाकोडे याला परीक्षेदरम्यान मोबाईल फोन वापरताना आढळल्याचे सांगितले जाते. परीक्षा पर्यवेक्षक प्राध्यापकांनी त्याला परीक्षा हॉलमधून बाहेर काढले. त्याच दिवशी नंतर त्याने आत्महत्या केली. दुसऱ्याच दिवशी संस्थेने जनतेसमोर एक अत्यंत विशिष्ट स्वरूपाची माहिती मांडली. साहिलला प्रश्नपत्रिका ChatGPT वर अपलोड करताना पकडण्यात आले होते, त्याचे समुपदेशन करण्यात आले होते, त्याला आश्वस्त करण्यात आले होते आणि त्याच्याविरुद्ध कोणतीही शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात आली नव्हती, असे संस्थेने सांगितले. मात्र, दोन दिवसांनंतर संस्थेला माफी मागावी लागली. चौकशी पूर्ण होण्यापूर्वीच घटनांचे स्वरूप निश्चित करून भाष्य करणे अयोग्य होते, अशी कबुली संस्थेने दिली. साहिलच्या वडिलांनी संबंधित प्राध्यापकाकडून गेल्या अनेक महिन्यांपासून जातीय स्वरूपाचा छळ होत असल्याचा आरोप केला आहे. संबंधित प्राध्यापकाने हे आरोप फेटाळले असून प्राध्यापकांच्या मंचानेही त्यांची बाजू घेतली आहे. या घटनेच्या निषेधार्थ शेकडो विद्यार्थी रस्त्यावर उतरले. विद्यार्थ्यांचे आंदोलन अद्याप सुरू आहे; मात्र आंदोलकांची संख्या कमी झाली आहे. परीक्षा पर्यवेक्षक प्राध्यापक सूर्यनारायण दुल्ला यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०८ आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ अंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला आहे. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे. परीक्षा हॉलमध्ये नेमके काय घडले, हे तपास यंत्रणा आणि न्यायालयांनी निश्चित करायचे आहे. मात्र, ही घटना एक महत्त्वाचा दृष्टिकोन उपलब्ध करून देते. कारण भारतीय अभिजन तांत्रिक शिक्षणव्यवस्था ज्या तीन गोष्टींना दीर्घकाळ एकमेकांपासून वेगळे ठेवण्याचा प्रयत्न करत आली आहे, त्या तिन्ही गोष्टी या एका घटनेत एकत्र आल्या आहेत. त्या म्हणजे जात, शिस्त आणि संस्थात्मक स्वसंरक्षण. या लेखाचा मूलभूत युक्तिवाद असा आहे की, या समस्या एकमेकांपासून वेगळ्या नाहीत. आयआयटी, आयआयएम आणि इतर काही नामांकित शैक्षणिक संस्थांबद्दल दीर्घकाळापासून एक समज दृढ केला गेला आहे की, या संस्थांमध्ये जातीला कोणतेही स्थान नाही. यामागील तर्क परिचित आहे. प्रवेश स्पर्धा परीक्षेद्वारे दिला जातो. ही परीक्षा गुणवत्ता मोजते. गुणवत्तेचा जन्माशी काही संबंध नसतो. त्यामुळे या संस्था म्हणजे गुणवत्तेच्या तत्त्वावर चालणारी अशी केंद्रे आहेत, जिथे विद्यार्थी प्रवेशद्वारावरच जात मागे सोडून येतात. या दृष्टिकोनानुसार, जात ही केवळ राजकीय हस्तक्षेपामुळे, आरक्षणामुळे किंवा स्वतःच्या अपयशाचे खापर इतरांवर फोडू पाहणाऱ्या असंतुष्ट व्यक्तींमुळे शैक्षणिक परिसरात प्रवेश करते. हा समज समाधानकारक आणि संस्थात्मकदृष्ट्या सोयीचा आहे. कारण जात अस्तित्वातच नसेल, तर जातीय भेदभावाची तक्रार करणारी व्यक्तीच दोषी ठरवली जाऊ शकते. अशा वेळी जबाबदारी संस्थेवरून तक्रारदार विद्यार्थ्याकडे शांतपणे ढकलली जाते. आता त्या विद्यार्थ्याला केवळ आपल्यासोबत काहीतरी घडले आहे हेच सिद्ध करायचे नसते, तर ज्या गोष्टीचे अस्तित्वच संस्था नाकारते, त्याच प्रकारात आपला अनुभव मोडतो हेही सिद्ध करावे लागते. या संस्थांच्या इतिहासात दलितांच्या प्रवेशाला विरोध करण्याच्या स्वरूपात जातीय पूर्वग्रह खोलवर रुजलेले आहेत. विद्यार्थी म्हणून प्रवेश किंवा प्रशासकीय पदांवरील नियुक्ती यांना विरोध करणे जेव्हा कठीण झाले, तेव्हा प्राध्यापक भरतीमध्ये हा विरोध कायम राहिला. कारण प्राध्यापकवर्ग हा या संस्थांमधील बौद्धिक अभिजनांचा स्तर मानला जातो. आजही आयआयएम आणि त्यांच्या समकक्ष संस्थांनी फेलो कार्यक्रमातील प्रवेशासाठी आरक्षण लागू केलेले नाही. या कार्यक्रमातून त्यांच्या प्राध्यापकवर्गातील अत्यल्प दलित प्रतिनिधित्व सुधारण्यास मदत होऊ शकते, याची त्यांना पूर्ण जाणीव आहे. आयआयटी संस्थांनी अनेक वर्षे प्राध्यापक पदांवरील आरक्षणाला, विशेषतः वरिष्ठ पदांवरील आरक्षणाला, विरोध केला किंवा त्याच्या अंमलबजावणीवर मर्यादा आणल्या. या संस्थांनी स्वतःला 'उत्कृष्टतेची केंद्रे' असल्याचे सांगत आरक्षणाला विरोध केला. मात्र, त्याचे परिणाम आजही स्पष्ट दिसतात. आयआयटी मुंबईमध्ये एकूण ४१२ प्राध्यापकांपैकी केवळ पाच प्राध्यापक अनुसूचित जातींचे आहेत आणि अनुसूचित जमातींचा एकही प्राध्यापक नाही. ३६३ सहयोगी आणि सहाय्यक प्राध्यापकांमध्ये अनुसूचित जातींचे केवळ २९ आणि अनुसूचित जमातींचे आठ प्राध्यापक आहेत. आयआयटी कानपूरमध्ये २५७ प्राध्यापकांपैकी एकही प्राध्यापक अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचा नाही. १२८ सहयोगी प्राध्यापकांमध्ये अनुसूचित जातींचे केवळ आठ आणि अनुसूचित जमातींचा एक प्राध्यापक आहे. तर १९३ सहाय्यक प्राध्यापकांमध्ये अनुसूचित जातींचे १७ आणि अनुसूचित जमातींचे चार प्राध्यापक आहेत. विशेषतः सर्वोच्च पदांवर अनुसूचित जाती-जमातींच्या प्राध्यापकांची जवळजवळ अनुपस्थिती केवळ वैयक्तिक गुणवत्तेच्या आधारे स्पष्ट करता येत नाही. या आकडेवारीतून ऐतिहासिकदृष्ट्या पुनरुत्पादित होत असलेल्या संस्थात्मक संरचनेचे दर्शन घडते. उच्चवर्णीयांची उपस्थिती म्हणजे गुणवत्तेचा नैसर्गिक परिणाम, असे सामान्यीकरण केले जाते; तर दलितांचे वगळले जाणे हे त्यांच्या कथित गुणवत्तेच्या अभावामुळे घडते, असे सांगितले जाते. गुणवत्तेविषयीची ही धारणा समाजातील एका खोलवर रुजलेल्या विचारसरणीचे प्रतिबिंब आहे. ऐतिहासिकदृष्ट्या विशेषाधिकार प्राप्त समाजघटकांनाच शैक्षणिक क्षमतेचे नैसर्गिक प्रतिनिधी मानले जाते. दुसरीकडे, दलित समाजाला भेडसावणाऱ्या संरचनात्मक अडचणी आणि विषमता अदृश्य केल्या जातात. जात शिक्षणाच्या संधी, सांस्कृतिक भांडवल, भाषा, व्यावसायिक संपर्कजाळे आणि उच्च शिक्षणापर्यंतच्या प्रवेशावर प्रभाव टाकते. जातिव्यवस्थेमुळे मिळालेले फायदे वैयक्तिक गुणवत्ता म्हणून मांडले जातात; तर जातीमुळे निर्माण झालेले तोटे वैयक्तिक कमतरता म्हणून दाखवले जातात. त्यामुळे या संस्थांमध्ये आरक्षणाला झालेला दीर्घकालीन विरोध आणि सर्वोच्च स्तरावर कायम असलेली तीव्र विषमता हे दर्शवते की, शैक्षणिक उत्कृष्टतेची व्याख्या आणि तिचे पुनरुत्पादन यांमध्ये जात आजही कार्यरत आहे. आयआयटी संस्थांचा 'उत्कृष्टतेची केंद्रे' असल्याचा दावा मोठ्या संख्येने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांमधून अत्यंत अल्प विद्यार्थ्यांची निवड करण्याच्या क्षमतेवर मोठ्या प्रमाणात आधारित आहे. मात्र, अनेक दशकांचा लौकिक आणि मोठी गुंतवणूक असूनही, या संस्थांपैकी एकाही संस्थेला जगातील प्रमुख विद्यापीठांच्या क्रमवारीत पहिल्या १०० मध्ये स्थान मिळालेले नाही. अशा क्रमवारीतही काही पूर्वग्रह असू शकतात आणि त्यांना उत्कृष्टतेचे अंतिम मोजमाप मानता येणार नाही. तरीही आयआयटीच्या वतीने केले जाणारे बिनशर्त उत्कृष्टतेचे दावे या क्रमवारीमुळे प्रश्नांकित होतात. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, आरक्षणाची अंमलबजावणी केल्यामुळे या संस्थांची शैक्षणिक प्रतिष्ठा किंवा दर्जा कमी झाल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. दलित प्राध्यापक आल्यास गुणवत्तेशी तडजोड होईल, हा युक्तिवाद केवळ एक दावा आहे; सिद्ध झालेले तथ्य नाही. जगभरात विविधतेमुळे शिक्षण आणि संस्थात्मक जीवन अधिक समृद्ध होते, ही बाब वाढत्या प्रमाणात मान्य केली जात आहे. दलित विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांना आयआयटीमध्ये समाविष्ट केल्यास विविध दृष्टिकोनांना वाव मिळू शकतो, परंपरेने चालत आलेल्या गृहीतकांना आव्हान देता येऊ शकते आणि शैक्षणिक संस्कृती अधिक समृद्ध होऊ शकते. ऐतिहासिकदृष्ट्या विशेषाधिकार प्राप्त समाजघटकांची उपस्थिती म्हणजेच गुणवत्तेचा नैसर्गिक आधार, असे मानण्याचा या संस्थांचा आग्रह पाहता असे दिसते की, आधुनिक तंत्रज्ञानाचा मुखवटा धारण करूनही आयआयटी आजही शतकानुशतके जुन्या 'अग्रहार मानसिकते'नुसार कार्यरत आहेत. या संस्थांमध्ये, इतर ठिकाणांप्रमाणेच, जातीय भेदभाव क्वचितच थेट अस्पृश्यतेच्या स्वरूपात समोर येतो. तो छोट्या, सूक्ष्म आणि सहज नाकारता येण्याजोग्या कृतींतून व्यक्त होतो. विद्यार्थ्यांचे आडनाव विचारणे, त्याच्या प्रवेश परीक्षेतील गुणांची चौकशी करणे आणि त्यावरून त्याची जात ओळखण्याचा प्रयत्न करणे, या प्रक्रियेतून त्याच्या क्षमतेविषयी कायमस्वरूपी कमीपणाची धारणा निर्माण केली जाते. 'कोट्यातून आलेला विद्यार्थी' असा शिक्का मारणे, मित्रांचे आणि अभ्यासगटांचे अनौपचारिकपणे जातीनुसार विभाजन होणे, पुढे काय परिणाम होतील या भीतीने स्वतःची जातीय ओळख उघड न करणे, तसेच मार्गदर्शन, मूल्यमापन आणि शिफारशी करताना प्राध्यापकांकडून दाखवला जाणारा पक्षपाती दृष्टिकोन, या सगळ्यांतून जातीय भेदभाव कार्यरत असतो. यापैकी अनेक गोष्टी कोणत्याही नियमपुस्तिकेत नोंदवलेल्या नसतात. आयआयटी मुंबईच्या स्वतःच्या अनुसूचित जाती-जमाती कक्षाने २०२२ मध्ये जवळपास ४०० विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण केले होते. त्यातील सुमारे एक चतुर्थांश विद्यार्थ्यांनी आपली जात ओळखण्यासाठी त्यांना आडनाव विचारण्यात आल्याचे सांगितले. तर एक तृतीयांशपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षेतील गुण विचारून त्यांची जात ओळखण्याचा प्रयत्न झाल्याचे नमूद केले. लक्षणीय संख्येने विद्यार्थ्यांनी जातीय भेदभावामुळे मानसिक आरोग्यावर परिणाम झाल्याचे सांगितले. तर अनेक विद्यार्थ्यांनी आपली जातीय ओळख उघड झाल्यास काय परिणाम होतील, या भीतीने सहाय्यक विद्यार्थी संघटनांपासून दूर राहणे पसंत केले. मात्र, सुमारे ८३ टक्के विद्यार्थ्यांनी स्वतःला कधीही जातीय अपशब्द किंवा भेदभावाचा सामना करावा लागला नसल्याचे सांगितले. याचा अर्थ असा की, विद्यार्थ्यांमधील एका मोठ्या अल्पसंख्याक गटाला सूक्ष्म जातीय भेदभावाचा सतत आणि कमी तीव्रतेचा मानसिक भार सहन करावा लागतो; मात्र बहुसंख्य विद्यार्थ्यांना त्याची जाणीवही होत नाही. संस्थेने स्वतःचा अनुसूचित जाती-जमाती कक्ष स्थापन करून ही समस्या मान्य केली असली, तरी जातीशी संबंधित कोणतीही घटना घडली की तिचे अस्तित्व नाकारण्याची भूमिका घेतली जाते. २०२३ मध्ये आयआयटी मुंबईतील दर्शन सोळंकीच्या मृत्यूनंतर संस्थेच्या अंतर्गत समितीने जातीय भेदभावाचा निष्कर्ष नाकारला. मात्र, दर्शनच्या कुटुंबीयांनी आणि विद्यार्थी संघटनांनी या निष्कर्षाला विरोध केला. पोलिसांच्या तपासातून वेगळे पुरावे समोर आले; परंतु त्यातही जातीय भेदभावाचा मुद्दा मान्य करण्यात आला नाही. यातून मिळणारा धडा किलवेनमणी आणि खैरलांजी येथील घटनांपेक्षा वेगळा नाही. किलवेनमणी येथे जातीय वर्चस्ववादी हिंदूंनी ४४ दलित शेतमजुरांना, त्यात लहान मुलांचाही समावेश होता, जिवंत जाळले. खैरलांजी येथे दलित कुटुंबातील चार सदस्यांवर लैंगिक अत्याचार करून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. दोन्ही घटनांमध्ये जातीय संघर्षाची स्पष्ट पार्श्वभूमी होती. तरीही न्यायालयीन तपासात जातीय संदर्भाची नोंद घेण्यात आली नाही. उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाखाली असलेल्या संस्थांना अजूनही हे समजलेले नाही की, जात ही एखादी वस्तू नाही. ती पूर्वग्रहांच्या स्वरूपात व्यक्त होते आणि अशा पूर्वग्रहांचे अस्तित्व अनेकदा परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारेच सिद्ध करता येते. २०२५ मध्ये आयआयटी मुंबईच्या एचएसएस इमारतीच्या गच्चीवर रमजान पाळण्याचा एक प्रसंग घडला. संस्थेमध्ये हिंदू सण सार्वजनिकपणे साजरे करणाऱ्या उजव्या विचारसरणीच्या विद्यार्थी संघटनांनी या मुद्द्याला प्रसारमाध्यमांमध्ये वादाचा विषय बनवले. आंबेडकर-फुले-पेरियार स्टडी सर्कलशी (APPSC) संबंधित दोन पीएच.डी. विद्यार्थ्यांना प्रसारमाध्यमांनी याबाबत विचारले असता, त्यांनी रमजान पाळण्यात काहीही गैर नसल्याचे सांगितले. कारण संस्थेच्या परिसरात हिंदू सणही खुलेपणाने साजरे केले जातात, असे त्यांचे म्हणणे होते. यानंतर या दोन्ही विद्यार्थ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली. प्राध्यापक सूर्यनारायण दुल्ला यांनी त्यांना शिक्षा केली. हे तेच प्राध्यापक आहेत, ज्यांच्यावर आता साहिल वाकोडेच्या आत्महत्येप्रकरणी आरोप ठेवण्यात आले आहेत. त्यावेळी ते शैक्षणिक शिस्तभंग समितीचे अध्यक्ष होते. एका विद्यार्थ्याला आठ महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले, तर दुसऱ्या विद्यार्थ्याला १३ महिन्यांसाठी निलंबित करून वसतिगृह प्रवेशावरही बंदी घालण्यात आली. प्रसारमाध्यमांशी बोलणे हा शिस्तभंगाचा गुन्हा ठरू शकतो का, हा एक व्यापक प्रश्न आहे. कोणताही संस्थात्मक नियम विद्यार्थ्यांच्या घटनात्मक अधिकारांवर मात करू शकत नाही. त्यामुळे अशा प्रकारची शिक्षा योग्य ठरू शकते का, याचाही विचार करणे आवश्यक आहे. मात्र, या दोघांच्या शिक्षेतील तफावत विशेष लक्षवेधी आहे. बिगरदलित विद्यार्थ्याला तुलनेने कमी शिक्षा देण्यात आली, तर दलित विद्यार्थ्याला अधिक कठोर शिक्षा देण्यात आली. दोन्ही विद्यार्थ्यांची परिस्थिती वेगवेगळी होती. पहिला विद्यार्थी पीएच.डी. पूर्ण करण्याच्या टप्प्यावर होता, तर दुसरा विद्यार्थी केवळ दुसऱ्या वर्षात शिकत होता. त्यामुळे या शिक्षेतील असमानता अधिक ठळकपणे दिसून येते. दलित विद्यार्थ्याने प्राध्यापक दुल्ला यांची भेट घेतली असता त्यांनी त्याच्याशी अपमानास्पद वर्तन केल्याचे आणि तातडीने ई-मेल पाठवून त्याला संस्थेच्या परिसरात प्रवेश करण्यास बंदी घातल्याचे सांगितले जाते. या घटनेकडे केवळ शिस्तीची अंमलबजावणी करणाऱ्या असहिष्णू प्राध्यापकाचे वर्तन म्हणून पाहून चालणार नाही. त्यामध्ये जातीय पूर्वग्रहांचे अस्वस्थ करणारे प्रतिबिंब दिसते. या शिक्षेला आव्हान देणारे एक प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. गेल्या दशकभरात या संस्था मतभिन्नता आणि विरोधी मतांबाबत अधिकाधिक असहिष्णू बनल्या आहेत. त्यांच्या कामकाजात सल्लामसलतीचे प्रमाण कमी झाले आहे आणि सत्ताधारी व्यवस्थेशी वैचारिक जवळीक असलेल्या व्यक्तींच्या नेतृत्वाखाली दंडात्मक कारवाईची प्रवृत्ती वाढली आहे. या विचारसरणीचे प्रतिबिंब दलित समाजघटकांशी केल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वर्तनात दिसून येते. याचे सुरुवातीच्या काळातील सर्वाधिक परिचित उदाहरण म्हणजे २०१५ मध्ये आयआयटी मद्रासमधील अंबेडकर-पेरियार स्टडी सर्कलची (APSC) मान्यता रद्द करण्यात आली होती. देशव्यापी विरोधानंतरच हा निर्णय मागे घेण्यात आला. त्याच वेळी हिंदुत्ववादी विचारसरणीशी संबंधित विद्यार्थी संघटनांना मात्र अस्तित्वात राहण्याची मुभा होती. आयआयटी मुंबईमध्ये आरक्षित शाकाहारी टेबलावर मांसाहारी पदार्थ खाऊन निषेध करणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड ठोठावण्यात आला होता. संस्थांमध्ये नियम अधिकाधिक वेळा केवळ नोटिसा काढून लागू केले जात आहेत आणि त्या नियमांना आव्हान देण्यासाठी विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असलेली जागा संकुचित होत आहे. आयआयटी मुंबईने प्रकाशित केलेल्या शैक्षणिक गैरप्रकारांवरील कारवाईच्या प्रक्रियेत गैरप्रकार शोधणे आणि त्यावर निर्णय घेणे या दोन गोष्टी वेगळ्या ठेवल्या आहेत. परीक्षेदरम्यान गैरवर्तन आढळल्यास पर्यवेक्षकाने संबंधित साहित्य जप्त करावे, विद्यार्थ्याला नवीन उत्तरपत्रिका द्यावी, त्याला परीक्षा सुरू ठेवण्याची परवानगी द्यावी आणि या घटनेचा अहवाल विभागप्रमुखांकडे सादर करावा, अशी तरतूद आहे. यानंतर शिस्तभंग समिती निर्णय घेते. तक्रार करणाऱ्या प्राध्यापकाला या निर्णयप्रक्रियेत सहभागी होता येत नाही. संशयाचा फायदा विद्यार्थ्याला दिला जातो आणि त्याला संबंधित पुरावे उपलब्ध करून देऊन उत्तर देण्यासाठी दोन कामकाजाचे दिवस दिले जातात. साहिलच्या प्रकरणात या प्रक्रियेचे पालन झालेले दिसत नाही. प्राध्यापकांनी मोबाईल फोन आणि उत्तरपत्रिका ताब्यात घेऊन विद्यार्थ्याला परीक्षा हॉलच्या बाहेर नेल्याची जी माहिती समोर आली आहे, त्यावरून संस्थेच्या नियमांचे स्पष्ट उल्लंघन झाल्याचे दिसते. याशिवाय स्वतः नियमांबाबतही एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. प्रा. प्रतिभा शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली जुलै २०२६ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या समितीने शिक्षेच्या सुधारित नियमावलीचा प्रस्ताव मांडला होता. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सिनेटने त्याला मंजुरी दिली. मात्र, या नियमांची अंमलबजावणी करण्याचा आदेश १८ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आला. हाच तो दिवस होता, ज्या दिवशी साहिलने आत्महत्या केली. नवीन शिक्षाव्यवस्थेनुसार, अनधिकृत इलेक्ट्रॉनिक उपकरण जवळ बाळगल्यास, पहिल्याच गुन्ह्यासाठीसुद्धा अनुत्तीर्ण घोषित करणे आणि एका सत्रासाठी निलंबित करणे अशी शिक्षा निश्चित करण्यात आली होती. मात्र, मध्यसत्र परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांना या नव्या नियमांची माहिती देण्यात आली होती की नाही, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. एका संपूर्ण सत्रासाठी निलंबित करणे ही सामान्य स्वरूपाची शिक्षा नाही. त्यामुळे विद्यार्थी आपल्या वर्गमित्रांपासून, संस्थेच्या परिसरापासून आणि शैक्षणिक प्रवाहापासून दूर फेकला जातो. शिवाय, फसवणूक केल्याचा कलंक घेऊन त्याला घरी परतावे लागते. शैक्षणिक शिस्तीचे नियम असू नयेत, असा आपला आक्षेप नाही. मात्र, हे नियम आधी सर्व विद्यार्थ्यांना स्पष्टपणे कळवले गेले पाहिजेत आणि त्यांची अंमलबजावणी सर्वांसाठी समान पद्धतीने झाली पाहिजे, अशी अपेक्षा आहे. दुर्दैवाने, या नियमांची अंमलबजावणी समान पद्धतीने होत नाही. आणि याच असमानतेच्या ठिकाणी जात प्रवेश करते. एखादा नियम स्वतःमध्ये जातिनिरपेक्ष असू शकतो. मात्र, त्याची अंमलबजावणी करताना व्यक्तीच्या विवेकाधिकाराला महत्त्व प्राप्त होते. कोणाची तक्रार केली जाते, कोणाला केवळ इशारा दिला जातो, कोणाचे समुपदेशन केले जाते, कोणाला संशयाचा फायदा दिला जातो, कोणाचे स्पष्टीकरण स्वीकारले जाते, कोणाची चूक केवळ अनवधानाने घडलेली मानली जाते आणि कोणाच्या चुकीकडे त्याच्या चारित्र्यातील दोष म्हणून पाहिले जाते, हे सर्व निर्णय घेणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून असते. हे विवेकाधिकार वापरणाऱ्या व्यक्ती समाजातूनच आलेल्या असतात. त्यामुळे समाजातील पूर्वग्रह त्यांच्याही मनात असतात. कोण पात्र आहे आणि कोण खऱ्या अर्थाने गुणवत्तेच्या आधारावर येथे आले आहे, याविषयीच्या धारणा त्यांच्या निर्णयांवर प्रभाव टाकतात. त्यामुळे वरकरणी कठोर आणि मनमानी वाटणारी व्यवस्था सर्वांसाठी समान स्वरूपात कठोर नसते. ज्या विद्यार्थ्याला सामाजिक संरक्षण कमी आहे, त्याच्यासाठी ही व्यवस्था अधिक कठोर ठरते. एकाच कृतीचा अर्थ ती कृती करणाऱ्या व्यक्तीच्या सामाजिक ओळखीनुसार वेगवेगळा लावला जातो. थे दोन दावे वेगळे करून पाहणे आवश्यक आहे. पहिला दावा म्हणजे असमान वागणूक. एकाच प्रकारचे वर्तन केल्याबद्दल दलित विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक वेळा किंवा अधिक कठोर शिक्षा दिली जाते. हा दावा संभवनीय आहे; मात्र, त्याला सिद्ध किंवा खोडून काढण्यासाठी सामाजिक प्रवर्गानुसार विभागलेली शिस्तभंगाच्या कारवाईची आकडेवारी सार्वजनिकरीत्या उपलब्ध नाही. दुसरा दावा म्हणजे शिक्षेचा असमान परिणाम. एकाच प्रकारचे निलंबन, एकच दंड किंवा सार्वजनिकरीत्या केलेला एकच आरोप वेगवेगळ्या सामाजिक पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांवर वेगवेगळे परिणाम घडवतो. शिष्यवृत्तीवर अवलंबून असलेल्या आणि कुटुंबाने आपली बचत तसेच सामाजिक प्रतिष्ठा पणाला लावून ज्याला शिक्षणासाठी पाठवले आहे, अशा पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यासाठी एका सत्राचे निलंबन म्हणजे अनेक संकटांना आमंत्रण असते. त्याची शिष्यवृत्ती बंद होऊ शकते, शिक्षणातील त्याचा अस्थिर आधार संपुष्टात येऊ शकतो आणि त्याला घरी परतावे लागू शकते. त्याच्या समाजाकडून या परतीचा अर्थ अपयश असा लावला जाऊ शकतो. याउलट, सामाजिकदृष्ट्या प्रभावशाली आणि व्यापक संपर्कजाळे असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांकडे अशा संकटांना तोंड देण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध असतात. दलित विद्यार्थ्यांकडे मात्र असे सामाजिक संरक्षण नसते. २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत भारतातील २३ आयआयटी संस्थांमध्ये एकूण ४५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. त्यापैकी नऊ विद्यार्थी अनुसूचित जातींचे आणि सात विद्यार्थी अनुसूचित जमातींचे होते. म्हणजेच एकूण १६ विद्यार्थी किंवा ३५.६ टक्के विद्यार्थी या दोन प्रवर्गांतील होते. आणखी १२ विद्यार्थी इतर मागासवर्गीय (OBC) समाजघटकांतील होते. त्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण एकूण आत्महत्यांमध्ये ६२.२ टक्के होते. याच्या तुलनेत आयआयटीमधील एकूण विद्यार्थीसंख्येत अनुसूचित जातींचे विद्यार्थी साधारणतः १४ ते १५ टक्के आणि अनुसूचित जमातींचे विद्यार्थी ५ ते ६ टक्के आहेत. म्हणजेच या दोन्ही प्रवर्गांचे एकत्रित प्रमाण जवळपास २० टक्के आहे. या प्राथमिक तुलनेनुसार, अनुसूचित जाती आणि जमातींच्या विद्यार्थ्यांचे आत्महत्यांमधील प्रमाण त्यांच्या एकूण प्रवेशाच्या प्रमाणापेक्षा जवळपास १.७ पट अधिक आहे. यापूर्वी उपलब्ध असलेल्या राष्ट्रीय आकडेवारीच्या तुलनेत ही विषमता अधिक चिंताजनक संकेत देते. तथापि, आकडेवारीची संख्या मर्यादित असल्यामुळे त्यावरून सांख्यिकीयदृष्ट्या ठोस निष्कर्ष काढता येत नाहीत किंवा आत्महत्यांची नेमकी कारणे निश्चित करता येत नाहीत.

लेखक: आनंद तेलतुंबडे, नागरी हक्क कार्यकर्ते आहेत.

मूळ लेख : The Wire । १२ ऑक्टोबर २०२६

अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे